

Rayat Shikshan Sanstha's

**KARMAVEER BHAURAO PATIL MAHAVIDYALAYA, PANDHARPUR (Autonomous), Dist. Solapur.**

# Academic Year 2023-24

# Entrepreneurship Development Cell and Internal Quality Assurance Cell

## Jointly Organize

## Under the Agis of RUSA Component– 8

# *Trade Fair, Career Fair and Exhibition – 2023.*

## Report

**Saturday, Date- 23 December 2023**

रयत शिक्षण संस्थेचे
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त), जि. सोलापूर.
शैक्षणिक वर्ष २०२३ -२४
राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रूसा काम्पोनंट-8) अंतर्गत

# उद्योजकता विकास समिती व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आयोजित

# Trade Fair, Career Fair and Exhibition -२०२३

'ट्रेड फेयर, करिअर फेअर व प्रदर्शन -२०२३ भव्य मेळावा'
शनिवार दि. २३ /१२ /२०२३

## अहवाल =

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात शनिवार दिनांक 23/१२/२०२३ रोजी उद्योजकता विकास समिती व अतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने रूसा काम्पोनंट -८ अतर्गत एक दिवसीय 'ट्रेड फेअर, करिअर फेअर व प्रदर्शन- भव्य व्यापारी मेळावा 2023 याचे आयोजन करण्यात आले. या नियोजनाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना आपले पदवीचे शिक्षण घेण्याबरोबरच व्यावसायिक शिक्षण मिळावे. त्यांच्या अंगी विविध व्यापारी कौशल्य निर्माण व्हावीत तसेच ते भविष्यात आपला उद्योग उभारून स्वत:च्या पायावर उभे राहावेत या दृष्टीने त्यांना माहिती व्हावी. यासाठी सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.


सदर मेळाव्याचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव व रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य मा. प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव साहेब यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. सदर उद्घाटन समारंभ प्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. अमरजीत पाटील व मा. प्रा. श्री. धायगुडे सर, डॉ. राजेंद्र जाधव उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे साहेब, कला विभागाचे उपप्राचार्य मा. प्रो. डॉ. बी. एस. नाईकनवरे सर, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य प्रो. डॉ. शितोळे सर, सायन्स विभागाचे उपप्राचार्य मा. प्रा. कवडे सर , डिन प्रो. डॉ. बळवंत सर, प्रा. डॉ. चोपडे सर , नॅक को-ऑर्डीनेटर प्रा. डॉ. कांबळे सर, रूसा समन्वयक प्रा. डॉ. पाठक, प्रा. डॉ. काळे, प्रा. डॉ. समाधान माने, प्रा. डॉ. रमेश शिंदे, परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. राजाराम राठोड, स्वायत्त महाविद्यालयाचे प्रा. डॉ. मधूकर जडल, ज्यूनियर विभागाचे प्रा. अवताडे सर, प्रा. मुसळे सर, प्रा. सावंत सर, ऑफिस प्रमुख मा. श्री, पारधी सर, इतर सहकारी प्राध्यापक व बंधु व भगिनी उपस्थित होते. सदर व्यापारी मेळाव्याचे उद्घाटन मा. डॉ. जे. जी. जाधव यांच्या शुभ हस्ते फित कापून करण्यात

आले. यामध्ये खाद्यपदार्थाच्या विविध स्टॉल पासून ते फनी गेम, ग्रंथ प्रदर्शन, करिअर मार्गदर्शन व प्रदर्शन म्हणून उभारण्यात आले होते.




*"रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य मा. डॉ. जे. जी. जाधव साहेब यांच्या शुभ हस्ते उद्घाटन समारंभ"*

विविध विषयांमध्ये पदवी व पदवीनंतर कोणकोणत्या प्रकारच्या संधी आहेत. त्यामध्ये पुढील शिक्षणाबाबतच्या संधी, सरकारी नोकऱ्या बाबतच्या असणाऱ्या संधी व व्यवसायासाठीच्या असणाऱ्या संधी याबाबत करियर मार्गदर्शन म्हणून विविध विविध मार्गदर्शक म्हणून बोर्ड लावण्यात आले होते. त्याचेही उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. डि. आर. बाड उमा महाविद्यालय, पंढरपूर यांनी केले. यावेळी वरील सर्व उपस्थित होते.




*"मा. प्राचार्य डॉ. डि. आर. बाड उमा महाविद्यालय, पंढरपूर करिअ फेअरचे उद्घाटन करताना"*


तसेच विद्यार्थ्यांना विविध जुन्या नाण्यांची माहिती व्हावी यासाठी जुन्या नाण्यांचे भव्य प्रदर्शन भरविण्यात आले होते. सदर प्रदर्शनाची उद्घाटन मा. श्री. अमरजीत पाटील यांनी केले त्यामध्ये जुन्या विविध ऐतिहासिक नाण्यांपासून आधुनिक असणारी विविध नाणी त्यामध्ये ठेवण्यात आलेली होती.





*"जुन्या नाण्यांचे व प्रदर्शनाचे उद्घाटन मा. श्री. अमरजीत पाटील"*

तसेच विद्यार्थ्यांना नवीन व आधुनिक पुस्तकांची माहिती व्हावी यासाठी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले होते. सदर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन माननीय प्राचार्य डॉ. सी जे खिलारे साहेब व मा. धायगुडे सर महाविद्यालय विकास समितीचे सन्माननीय सदस्तय यांनी केले. त्यामध्ये विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन पुस्तके विविध साहित्यिक ग्रंथ, संदर्भ ग्रंथ याशिवाय आधुनिक लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन विविध स्टॉलमध्ये लावण्यात आल्याचे दिसून आले. त्याचेही विद्यार्थ्यांनी पाहणी करून खरेदी केल्याचे दिसून आले.



*"विविध साहित्यिक ग्रंथ, संदर्भ ग्रंथ"*

विद्यार्थ्यांना बँकेविषयी माहिती व्हावी या उद्देशाने विविध बँकांना आमंत्रित केले होते. अशा बँकांनीही माहितीपर स्टॉल लावले होते. त्यामध्ये बँकेच्या असणाऱ्या विविध व्यावसायिक बाबतच्या कर्ज योजना, व्याजाचे दर, पुढील शिक्षणाबाबत असणाऱ्या बँकेच्या विविध योजना याबाबत योग्य ती माहिती विद्यार्थ्यांना यामधून मिळाली तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया यांची विमा योजना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन ठरल्याचे दिसून येते याचा बहुसंख्य विद्यार्थ्यांनी जाणून घेतले.

याशिवाय व्यापारांची व व्यापारी कौशल्याची माहिती व्हावी म्हणून विद्यार्थ्यांनी स्वत:चे काही भांडवल व रुसा कंपोनंट -८ अंतर्गत काही बीज भांडवल घेऊन विविध खाद्यपदार्थाचे व

विक्रीचे स्टॉल उभारण्यात आले होते. सदर स्टॉल हे विद्यार्थ्यांनी स्वत:च्या अंगी असणाऱ्या विविध खाद्यपदार्थ निर्मितीच्या अनुषंगाने ते स्वत: बनवून त्याची विक्री करण्यात आल्याचे दिसून आले. यातून त्यांचे कौशल्य पाहावयास मिळाले. स्वत:च्या कौशल्याचा त्यांनी पुरेपूर वापर करून अनेक खाद्य पदार्थ बनविल्याचे दिसून आले. याचा अनेक खवय्याने लाभ घेतल्याचे पाहावयास मिळाले. तसेच विद्यार्थ्यांच्या अंगी ग्राहकांना आकर्षित करण्याचे कौशल्य पहावयास मिळाले. अनेक विद्यार्थ्यांनी आपले व्यवहारी कौशल्यपणास लावून विक्री केल्याचे व व्यापारी आनंद घेतल्याचे पहावयास मिळाले.






*"स्वत:च्या कौशल्याचा त्यांनी पुरेपूर वापर करून अनेक खाद्य पदार्थ बनविले "*

महाविद्यालयातील बहुतांश विद्यार्थी ही ग्रामीन भागातील शेतीशी संबंधित आहेत. [illegible] आपल्या पालकास सुट्टीच्या दिवशी मदत करतात. काही दुधाचा व्यवसाय करतात. याचा विचार करून स्वत:च्या शेतात पिकविलेल्या भाजीपाल्याचे काही विद्यार्थ्यांनी विक्रीचे स्टॉल

लावलेले दिसून आले. स्वच्छ व ताजा शेतमाल असल्याने त्याचीही विक्री झाल्याचे दिसून आले. हा एक चांगला अनुभव असल्याचे सदर विद्यार्थ्यांने सांगितले.



*"स्वत:च्या शेतातील स्वच्छ व ताजा भाजीपाला विक्री करताना विद्यार्थी"'*


विद्यार्थ्यांना सध्याच्या काळात नोकरीचे वाढत जाणारे दुर्भिक्ष याचा विचार करून सरकारने सुरू केलेला स्टार्टअप् उपक्रम याची प्रभावी अमलबजावणी व्हावी यासाठी महाविद्यालयात विविध उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनाही त्याची माहिती व्हावी, त्यांना स्वत:चा व्यवसाय करता यावा या उद्देशाने प्राणिशास्त्र विभागाने रेशीम शेतीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रमाणे स्टार्टअप् स्टॉल लावलेला होता. त्याचीही पुर्ण माहिती विभागामार्फत विद्यार्थ्यांना देण्याची सोय केल्याने अनेक विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतल्याचे व त्याबाबत समाधान झाल्याचे दिसून आले.



*"रेशीम शेतीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक"*

सदर प्रदर्शनास माजी आमदार मा. दत्तात्रय सावंत, कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा येथील प्राचार्य डॉ. सुनील हेळकर, प्रा.अशोक लोंढे, प्रा. अशोक कदम, प्रा. बारबोले, प्रा. डॉ. सतीश घाडगे ही प्राध्यापक आणि संबंधित महाविद्यालयाचे विद्यार्थी यांनी एक मॉडेल म्हणुन भेट देवून त्यांचा आनंद घेतला.





*"विद्यार्थी स्टॉलचा आनंद घेतानाचे चित्रण"*

विद्यार्थी व प्राध्यापक हा ग्राहक वर्ग समोर ठेवून विद्यार्थ्यांनी आपल्या स्टॉलचे नियोजन केले होते. त्यातून अनेक स्टॉल धारक विद्यार्थ्यांनी आपले व्यापारी अनुभव कथन केले. सदर मेळाव्यामध्ये एकूण १४४ विविध खाद्य पदार्थाचे स्टॉल उभारण्यात आले होते प्रत्येक अनेक स्टॉल मध्ये एकूण पाच विद्यार्थी असे १४४ x ५ = ७२० विद्यार्थ्यांनी व्यवसायाचे ट्रेनिंग यातून घेतले.

तर महाविद्यालयातील सदर मेळाव्यास सर्व विदयार्थी, त्यांचे सबंधीत पालक, पंढरपूर शहरातील प्रतिष्ठित नागरिक, इतर विद्यालयातील विद्यार्थी व सेवक असे एकूण जवळपास २८४५ विद्यार्थ्यांनी मेळाव्याचा आनंद घेऊन खरेदी केल्याचे सर्व स्टॉलधारक विद्यार्थीनी समाधान व्यक्त केले.



*"प्रमुख पाहुणे मा.प्राचार्य जे.जी. जाधन रोख ठोक न्यूजवर मनोगत व्यक्त करताना"*

सदर कार्यक्रमासाठी भव्य स्टॉलचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये आवड, धाडस व कौशल्य मिळवून देण्यास सदर व्यापार मे ळावा यशस्वी झाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. या स्टॉल धारक विद्यार्थ्यांना त्यांनी गुंतविलेल्या भांडवला पेक्षा अधिक फायदा झाल्याचेही त्यांनी सांगितले अशा या व्यापार मेळाव्यासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी माननीय प्राचार्यांचे व सर्व आयोजकांचे आभार व्यक्त केले.या मेळाव्याचे आयोजन व संयोजन सुव्यवस्थित करून सर्वांना आनेद,व्यवसाय मार्गदर्शन व प्रदर्शनासाठी उपस्थित राहून आनंद घेत आला. त्याबद्दल यासर्वांचे उद्योजकता विकास समिती व ट्रेड फेअरचे समन्वयक यांनी योग्य नियोजन करण्यास सर्वतोपरी सहकार्य केल्याबद्दल माननीय प्राचार्य, उपप्राचार्य, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, एनसीसीचे विद्यार्थी,सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने सदर मेळावा आनंदाने पार पडण्यास मदत झाली त्याबद्दल सर्वांचे मनपूर्वक आभार.

समन्वयक,
ट्रेड फेअर -2023

Karmaveer Bhaurao Patil Mahavidyalaya
Pandharpur

प्राचार्य,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर.